Wed



# पाठ ४. उपास

– पु. ल. देशपांडे.

प्र.1] आकृत्या पूर्ण करा.-

अ] पंतांची आस्था वाटू लागलेल्या गोष्टी

- प्रोटीनयुक्त पदार्थ.
- चरबीयुक्त द्रव्ये.
- पदार्थांमधील कॅलरीज.

आ] पंतांच्या आहारतज्ज्ञ मित्रांनी वर्ज्य करायला सांगितलेल्या आहाराव्यतिरिक्तच्या गोष्टी

- दिवसा झोपणे.
- पत्ते खेळणे.
- बोलणे.

इ] पंतांच्या आहारनियंत्रणाविषयी त्यांच्या पत्नीच्या प्रतिक्रिया

- चमत्कारिक पदार्थ बनवणे.
- पडवळे उकडून खायला देणे.
- सडपातळ भाज्यांचा खुराक सुरू केला.
- वाळसेदार भाज्यांची स्वयंपाकघरातून हकालपट्टी.

प्र.2] कारणे शोधा.-

अ] वजन कमी करण्यासाठी न बोलण्याचा उपाय पंतांना जमणार नव्हता कारण . . =

→ पंत टेलिफोन ऑपरेटर असल्याने त्यांना दिवसभर बोलण्याशिवाय पर्याय नव्हता.

आ) बाबा बर्वे पंतांच्या समाचाराला आले नाहीत, कारण..
→ मुळातच बाबा बर्वेंचा लेखकावर आधीपासून राग होता.

प्र. ३) पाठाधारे खालील संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा :-
अ) भीष्म प्रतिज्ञा - पंतांनी आपले वजन कमी करण्याचे ठरवल्यावर
→ मित्रांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. त्यांचे एकशे एक्क्याऐंशी पौंड वजन पाहून त्यांची झोप उडाली. परंतु पंतांची झोप उडाली यावर रात्री घोरण्यामुळे त्यांच्या धर्मपत्नीचा विश्वास नव्हता. एकूण सर्वांनीच त्यांची चेष्टा केल्यावर त्यांनी 'दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!' अशी भीष्मप्रतिज्ञा केली म्हणजेच वजन कमी करण्याचा ठाम निश्चय पंतांनी केला.

आ) बाळसेदार भाज्या - पंतांच्या 'डाएटचा' बाबतीला कुटुंबाचा उत्साह अवर्णनीय होता. रोज काही काही चमत्कारीक पदार्थ त्यांच्या पानात पडायला लागले. बाळसेदार भाज्यांची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली. म्हणजेच कोबी, कॉलिफ्लॉवर अशा बाळसेदार भाज्यांमुळे पंतांचे वजन वाढेल असे वाटल्यामुळे त्या भाज्या कुटुंबाने आपणे सोडून दिले. शिवाय वजन कमी व्हावे म्हणून शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा अशा सडपातळ भाज्या खाणे सुरु केले.

इ) ~~वजन~~ वजनाचा मार्ग मलत्याच काट्यातून जातो - पंतांनी एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इत्यादी उग्र साधना करुनही पंतांचे वजन झाले, 'एकशे ब्याण्णव पौंड'. त्यामुळे त्यांनी यापुढे ~~वजन~~ जन्मात डाएटच्या आहारी न जाण्याचे ठरवले. कारण त्यांच्या मते

एवढे करूनही वजन काही कमी झाले नाही, कारण वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो.

३] असामान्य मनोनिग्रह - मित्र मंडळींचे उपाद बाबतीतले विविध सल्ले पंत पाळत होते. कारकुळे साल्याची स्वप्न त्यांना पडू लागली, बिनाचाहाचा चहा ते पिऊ लागले. साखर पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होई, ते फळांवर जगू लागले. त्यांनी भाताला स्पर्श केला नव्हता. अशा, हे सर्व गोष्टी पंतांचा असामान्य मनोनिग्रहाचा प्रभाव होता. म्हणजेच ते आपल्या निर्णय वर दृढ होते.

प्र.५] खालील शब्द समूहासाठी पाठातून एक शब्द शोधा:-

१] ठरवलेले व्रत मध्येच सोडणे - व्रतभंग.

२] वजन घटवण्यासाठी आहार बदलण्याची कल्पना - आहारपरिवर्तन

३] भाषेचा (नदीसारखा) प्रवाह - वाक्प्रवाह.

प्र.५] अचूक शब्द ओळखून लिहा.

१] वडीलांसोबत / वडिलांसोबत / वडिलानसोबत / वडीलानसोबत =
→ वडिलांसोबत.

२] तालमिला / तालमीला / ताल्मीला / ताल्मिला =
→ तालमीला

३] गारहाणी / गाऱ्हाणि / गाऱ्हाणी / ग्राहणी =
→ गाऱ्हाणी.

प्र.6] खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा:

| वाक्प्रचार | | वाक्प्रचारांचा अर्थ |
|---|---|---|
| i] हात दाखवू अवलक्षण | → | आपण होऊन संकट ओढवून घेणे. |
| ii] सुरुंग लावणे | → | एखादा बेत उधळून लावणे. |
| iii] अंगाचा तिळपापड होणे | → | खूप संताप येणे. |
| iv] मूठभर मांस चढणे | → | स्तुतीने हुरळून जाणे. |

प्र.7] स्वमत :-

i] दोरीवरच्या उड्या मारण्याच्या प्रसंगातील तुम्हांला समजलेला विनोद स्पष्ट करा:

→ पंतांच्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर ~~झाल्यां~~ झाल्यांनंतर चाळीतील मित्रमंडळींनी त्यांना सल्ले द्यायला सुरुवात केली. कु. कमलिनी केंकरेंनी दोरीवरच्या उड्या मारल्यास वजन घटते असा सल्ला दिला. प्रत्यक्षात पंतांनी जेव्हा दोरीवरच्या उड्या मारण्यास सुरुवात केली, तेव्हा पहिली उडी शेवटची ठरली. त्यांच्या आठ गुणिले दहाच्या खोलीत पूर्ण दोरी फिरवणे शक्य नव्हते. त्यामुळे पहिल्या उडीतच दोरी ड्रेसिंग टेबलवरच्या तेलाच्या बाटल्या व औषधाच्या बाटल्या खाली घेऊन आली. दुसरी उडी अर्धवट मारण्याच्या प्रयत्नातच ती आचार्य बाबा बर्वेंच्या गळ्यात पडली. त्यांचा आधीच पंतांवर राग होता, त्यात ही दोरी गळ्यात पडली त्यामुळे त्यांना नको-नको ऐकून घ्यावे लागले. अशा प्रकारे दोरीवरच्या प्रत्येक उडीला अडथळे येत होते आणि उड्या मारणे शक्य होत नव्हते. ही हास्यपद गोष्ट ठरली.

2] पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या ~~पत्नीच्या~~ पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दांत वर्णन करा:-

→ पंतांनी वजन कमी करण्यासाठी आहारपरिवर्तन करण्याचे ठरवल्यावर

त्यांच्या पत्नीचा उत्साह अवर्णनीय होता. रोज काही काही नवे चमत्कारिक पदार्थ पंतांच्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती पडवळे उकडून त्यांनी पंतांना खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांच्या खुराक पंतांना देणे त्यांनी चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाक घरातून हकालपट्टी झाली होती. सकाळचा नहा पूर्वीसारखा शहीला नाही. अशा प्रकारे पंतांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह दिसून आला.

3) पाठातील ~~उपासाबाबत~~ ~~त्यांच्या~~ तुम्हांला सर्वांत आवडलेला विनोद कोणता तो का आवडला ते स्पष्ट करा:-

→ पंतांनी असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौंडांनी वजन घटेल अशी खात्री बाळगली होती. परंतु वजन काट्यावर वजन एकशे एक्याऐंशी पौंड दाखवले होते त्याच वजन काट्याने त्यांचे वजन आज एकशे ब्याण्णव पौंड दाखवले. शिवाय, 'आप बहुत समझदार और गंभीर हैं।' असे भविष्यही दाखवले. पंत एकीकडे पौष्टिक सात्विक आहार घेतात. लिंबाचा रस फलाहार, दूध व दुसरीकडे पंधरा दिवसात चार वेळा भात खाऊन तो अपवाद समजतात आणि वजन कमी झाले असेल अशी खात्री बाळगतात. हा विनोद मला सर्वांत जास्त आवडला.

॥ —— ॥ —— ॥